महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त-दु.नि./ता.स/२०२३/२४ दिनांक : ३ मे २०२४

## -: प्रसिद्धीपत्रक:-

**विषय** :- महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३
गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेर पडताळणीबाबत (Retotalling)

**संदर्भ** :- (१) दुय्यम निरीक्षक, गट-क, राज्य उत्पादन शुल्क (जाहिरात क्र. १११/२०२३)
(२) तांत्रिक सहायक, गट-क, (जाहिरात क्र. १११/२०२३ )

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ मधील दुय्यम निरीक्षक, गट-क, राज्य उत्पादन शुल्क (जाहिरात क्र. १११/२०२३) व तांत्रिक सहायक, गट-क, (जाहिरात क्र. १११/२०२३ ) या संवर्गांचा अंतिम निकाल दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षांस उपस्थित असलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'view' अंतर्गत उपलब्ध करुन दिल्या आहेत, तसेच गुणांची फेरपडताळणी (Retotaling) करू इच्छिणा-या उमेदवारांना फेरपडताळणीकरिता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Retotalling of Marks या लिंकवर क्लिक करावे.
(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.
(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉग-इन करावे.
(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.
(५) उपलब्ध होणा-या गुणपत्रकातील फेरपडताळणी करावयाची असलेल्या विषयाची निवड करून Save बटणवर क्लिक करावे.
(६) सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे.

**३.** गुणांच्या फेरपडताळणीकरिताची सदर वेबलिंक दिनांक ४ मे, २०२४;१२.०० ते १३ मे, २०२४;२३.५९ वाजेपर्यंत सुरू राहील.

**४.** उपरोक्त कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेर पडताळणीकरिता अर्ज करताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

दिनांक : ३ मे, २०२४ उपसचिव (परीक्षोत्तर-अराजपत्रित परीक्षा)
ठिकाण : नवी मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग